पोलीस आयुक्तालय ,अमरावती
दिनांक १७.११.२०२१

– प्रेस नोट –

दिनांक १२.११.२०२१ व दि.१३.११.२०२१ रोजी अमरावती शहरामधे अचानक निर्माण झालेल्या जातीय तणावाचे अनुषंगाने मा.पोलीस आयुक्त अमरावती व श्री.प्रभाकरराव वैद्य हनुमान व्यायाम प्रसारक मंडळ यांचे मार्गदर्शनाखाली पटवाचौक याठिकाणी शांतता समिती व मोहल्ला समीतीची बैठक आज दि.१७.११.२०२१ रोजीचे १८.०० वाजता आयोजीत केलेली आहे.

अमरावती शहरातील सर्व नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन मा. डॉ. आरती सिंह पोलीस आयुक्त अमरावती यांनी केलेले आहे.

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा, अमरावती

पोलीस आयुक्तालय,अमरावती
दिनांक १७.११.२०२१

— प्रेस नोट —

दिनांक १२.११.२०२१ व १३.११.२०२१ रोजी अमरावती शहरामध्ये अचानक जमावाने हिंसक वळण घेउन व शहरामध्ये तोडफोड सुरु केली होती. त्यामध्ये सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होवुन जिवीत हानी होण्याची सकृत दर्शनी परिस्थिती निर्माण झालेली होती.

अमरावती शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित रहावी याकरीता, प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कलम — १४४ जा.फौ.प्रमाणे संपुर्ण संचारबंदीचे ( कर्फ्यु ) आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

अमरावती शहरात मा. डॉ. आरती सिंह, पोलीस आयुक्त, अमरावती यांनी दिनांक १६.११.२०२१ चे २३.०० वा.दिनांक १७.११.२१ चे पहाटेपर्यंत पो. ठाणे कोतवाली, नागपुरी गेट, खोलापुरी गेट हद्दीतील राजकमल चौक, गांधी चौक, साबणपुरा, जवाहर गेट, मयुर चौक, टांगा पडाव, हनुमान नगर तसेच, पठाण चौक, चांदणी चौक येथील संपुर्ण भागाची पाहणी करुन संचारबंदी बंदोबस्तातील अधिकारी व अंमलदार यांचेसोबत शहरातील शांततेबाबतचा आढावा घेवुन बंदोबस्ताबाबत व कलम — १४४ जा.फौ.चे तंतोतंत पालनाबाबत सुचना दिल्यात. दरम्यान राजकमल चौक येथे एक संशयीत ट्रिपल सिट मोटार सायकल स्वार मिळून आल्याने त्याला पुढील कारवाईकरीता पो.ठाणे कोतवाली यांचे ताब्यात दिले.

अमरावती शहरातील सर्व नागरिकांना शांतता राखण्याचे व अफवावर विश्वास न ठेवण्याचे आवाहन मा. डॉ. आरती सिंह पोलीस आयुक्त अमरावती यांनी केलेले आहे.

कार्यालय पोलीस आयुक्त
अमरावती

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा, अमरावती

पोलीस आयुक्तालय ,अमरावती
दिनांक १७.११.२०२१

**— प्रेस नोट —**

दिनांक १३.११.२०२१ रोजी अमरावती शहरामधे अचानक जमावाने हिंसक वळण घेउन व शहरामध्ये तोडफोड सुरु केली होती.त्यामध्ये सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान होवुन जिवीत हानी होण्याची सकृत दर्शनी परिस्थिती निर्माण झालेली होती.

अमरावती शहरातील शांतता व सुव्यवस्था अबाधित राहावी याकरीता, प्रतिबंधात्मक उपाययोजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याकरीता कलम–१४४ जाफौ.प्रमाणे संपुर्ण संचारबंदीचे ( कर्फ्यु ) आदेश निर्गमित करण्यात आलेले आहे.

अमरावती शहरामधील विद्यार्थ्यांना परीक्षा फॉर्म भरावयाकरिता, आवागमन करण्यासाठी विद्यार्थ्यांना संचारबंदीमध्ये शिथिलता देणे आवश्यक असल्याने तसेच सार्वजनिक लोकांच्या हिताचे दृष्टीकोनातुन जिवनाश्यकवस्तु,कृषी केंद्र व सरकारी कार्यालय यांना संचारबंदीमध्ये शिथिलता देणे आवश्यक असल्याने

दिनांक १८.११.२०२१ रोजी पासुन सर्व जिवनावश्यक वस्तुंची प्रतिष्ठाणे / कृषी केंद्रे यांना सकाळी ११.०० ते १७.०० वा. पर्यंत सुरु राहतील. त्याचप्रमाणे, सर्व शासकीय कार्यालये ही त्यांचे नियत वेळेनुसार सुरु राहतील. तसेच, परीक्षार्थी यांना परीक्षेकरीता व परीक्षेचा फॉर्म भरण्याकरीता विहीत ओळखपत्रासह संचारबंदीमध्ये सुट देण्याचे मा. डॉ. आरती सिंह, पोलीस आयुक्त, अमरावती यांनी आदेश पारित केलेले आहे.

अमरावती शहरातील सर्व नागरिकांना शांतता राखण्याचे आवाहन मा. डॉ.आरती सिंह पोलीस आयुक्त अमरावती यांनी केलेले आहे.

पोलीस निरीक्षक
विशेष शाखा, अमरावती

कार्यालय पोलीस आयुक्त अमरावती